N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** लोहारा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0321 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/11/2025 10:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 06/11/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/11/2025
**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:56 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/11/2025 **Time (वेळ):** 10:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/11/2025 10:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तक्रारदार श्रीनारायणकर यांचे, भातागळी येथील शेतामध्ये,लोहारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रशांत रामचंद्र चौगुले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत ,प्रतिबंधक विभाग सोलापुर,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत ,प्रतिबंधक विभाग सोलापुर,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823225465

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञानेश्वर भिमराज कुकलारे | | | 1. सहायक पोलीस निरीक्षक, लोहारा,अधिकारी क्वर्टर,लोहारा ,लोहारा,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | निवृत्ती बळीराम बोळके | | | 1. सपोफौ/587,पोलीस लाईन लोहारा,लोहारा,लोहारा, धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 3 | आकाश मधुकर भोसले | | | 1. पोशि /135,पोलीस ठाणे लोहारा,लोहारा,लोहारा, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 4 | अर्जुन शिवाजी तिघाडे | | | 1. पोना /1595,पोलीस ठाणे , लोहारा,लोहारा,धाराशिव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | दागिने/आभूषण | सोन्याचे तोडे | 10 तोळे सोन्याचे कडे | 300,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

300,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

--.फिर्याद फिर्याद तारीख 12.11.2025

मी प्रशांत रामचंद्र चौगुले ,वय-43 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो.नं.9823225465

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापुर येथे पोलीस उप अधिक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि.06/11/2025 रोजी आम्ही आमचे कार्यालयात उपस्थित असताना आमचे पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र यांनी आम्हास फोन द्वारे कळविले की तक्रारदार श्री.विष्णु भिमराव नारायणकर रा. ठि. विरशैव्य ककाया नगर, सुंदर निवास लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव यांची लाच मागणी होत असले बाबतची तक्रार देणेसाठी मा. महासंचालक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयात गेले असता त्यांना पोलीस अधिक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय पुणे येथे भेटुन तक्रार देणेस सांगितले असून आपण सदर तक्रारदार यांना त्यांचे राहते गावी भेटुन त्यांची तक्रार ऐकुण घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशिर कारवाई करा असे आम्हास आदेशित करुन तक्रारदार यांचा मोबाईल क्रमांक दिला व पुढील कारवाईसाठी, पोलीस निरीक्षक निंबाळकर, लाप्रवि पुणे मपोहवा/7901 गोरे व पोशि/2845 आडके ,मपोहवा/2008 काळे ,पोशि/1966 प्रविण तावरे व शासकिय वाहन एम.एच.12 यु सी 4109 व चालक पोहवा कदम सर्व नेमणुक लाप्रवि पुणे हे मदत कामी दिले असल्याचे व ते 06/11/2025 रोजी 15.00वा पर्यंत मार्डी गाव ,लोहारा तालुका येथे आपणास भेटतील असे सांगितले. त्यांनतर आम्ही तहसिल कार्यालय,उत्तर सोलापुर यांना पंच मिळणेकामी पत्र व्यवहार केला असता 13.00 वा चे सुमारास पंच 1)श्री.इलाही मौला मोगल ,महसुल सहायक ,तहसिल कार्यालय,उत्तर सोलापुर,2)श्री. निलेश विलास कदम ,ग्राम महसुल अधिकारी नेमणुक तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सोलापुर येथे आमचे कक्षात हजर झाले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की,तक्रारदार यांनी मार्डी गाव,लोहारा येथे बोलावले असल्याचे सांगुन पोशि/862 पवार ,दोन्ही पंच असे खाजगी चारचाकी वाहनाने सोलापुर लाप्रवि कार्यालय येथुन रवाना होऊन तुळजापुर मार्गे मार्डी गाव येथे पोहोचलो ती वेळ 15.30 वा ची होती. सदर ठिकाणी तक्रारदार उपस्थित होते. त्यानतर थोड्या वेळात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथील पथक आले त्यावेळी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथील पथकातील अधिकारी व अंमलदार यांची तसेच तक्रारदार व दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली व घेतली.

त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. विष्णू भिमराव नारायणकर यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी

होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून इलाही मौला मोगल पंच क्र.2 म्हणून निलेश विलास कदम हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

तक्रारदार श्री. विष्णू भिमराव नारायणकर, वय 32 वर्षे, धंदा शेती रा. ठि. विरशैव्य ककाया नगर, सुंदर निवास लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव मो. नं. 9763113302

"मी श्री.विष्णु भिमराव नारायणकर,वय 32 वर्षे रा. ठि. विरशैव्य ककाया नगर, सुंदर निवास लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर माझे परीवारासह राहणेस आहे. मी शेती करतो व त्यावर माझे परीवाराचा उदरनिर्वाह चालतो. दि. 25/08/2025 रोजी माझा मित्र सौदागर सुरेश रणशूर याचा मला फोन आला व त्याने मला त्याचे घरी बोलावून घेतले व त्यावेळी त्याने मला सांगितले की त्याची आई त्याचेशी व त्याचे बायकोशी भांडण करत आहे. त्यावेळी मी त्या सर्वांची समजुत घालून भांडण सोडविले व तेथून निघुन गेलो. त्यानंतर थोडया वेळाने मी माझ्या कामानिमित्त लोहारा पोलीस स्टेशन येथे असताना माझा मित्र सौदागर तिथे आला व त्याने सांगितले की, त्याचे आईने घराचे दार आतून लावून घेतले आहे व ती उघडत नाही तु माझे सोबत चल असे सांगितल्याने मी सदर गोष्ट पोलीसांना सांगुन तेथून माझा मित्र सौदागर याचे सोबत त्याचे घरी गेलो त्यावेळी त्याचे बेडरुमचे दार आतून बंद होते.मी माझा मित्र सौदागर,त्याचे वडील व इतर लोकांनी बेडरुमचे बंद दार तोडले असता आतमध्ये सौदागर याच्या आईने गळफास घेतला होता. त्यावेळी सौदागर व त्याच्य वडीलांनी सौदागर याच्या आईला खाली उतरवले. त्यानंतर थोड्या वेळाने तिथे पोलीस आले व पुढील कारवाई करण्यात आली.

दिनांक 26/08/2025 रोजी दुपारी पोलीस भोसले यांनी मला लोहारा पोलीस स्टेशन येथे बोलाविल्याने मी लगेच लोहारा पोलीस स्टेशन येथे गेलो त्यावेळी पोलीस भोसले यांनी मला पोलीस स्टेशनचे इन्चार्ज कुकलारे साहेब यांचे केबीनमध्ये घेवुन गेले तेथे कुकलारे साहेब यांनी मला मित्र सौदागर याचे घरात झालेल्या घटने बाबत विचारले त्यावर मी त्यांना त्या घडलेल्या घटनेची संपुर्ण माहीती सांगितली त्यावर त्यांनी मला बाहेर थांबा असे सांगितले असता मी त्यांचे केबीनचे बाहेर येवुन थांबलो त्यावेळी पोलीस भोसले यांनी मला सांगितले की, माझा मित्र सौदागर व त्याच्या पत्नीविरोधात सौदागर याचा भाऊ महेश रणशुर याचे तक्रारीवरुन लोहारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयात तुमचा सहभाग असुन यामध्ये तुम्हाला आरोपी करायचे नसल्यास आम्हाला पाच लाख रुपये द्यावे लागतील असे साहेबांनी सांगितले आहे.तरी तुम्ही 10 मिनीटात सदरचे पैसे द्या असे म्हणून माझेकडे पाच लाख रुपयाची मागणी केली. सदरवेळी माझेकडे पैसे नसल्याने मी माझे हातातील 10 तोळे सोन्याचे कडे काढून पोलीस भोसले यांचेकडे दिले.. त्यावेळी तेथे पोलीस बोळके हे उपस्थित होते.त्यानंतर रात्री 10.00 वा. सुमारास माझा मित्र सौदागर व त्याच्या पत्नीविरोधात गुन्हा नंबर 252/2025 प्रमाणे दाखल करुन त्यांना थांबवुन ठेवले व मला तेथून सोडुन दिले. त्यानंतर दिनांक 29/08/2025 रोजी पोलीस भोसले, पोलीस बोळके हे माझे घरी येवुन मला म्हणाले की,त्या गुन्हयाचा तपास कुकलारे साहेब करीत असुन तुम्हाला साहेबांनी पोलीस स्टेशनला बोलविले आहे.मी त्यांना ठिक आहे असे म्हणुन मी पोलीस स्टेशनला गेलोच नाही. त्यानंतर दुस-या दिवशी दिनांक 30/08/2025 रोजी मी घरी नसताना पुन्हा पोलीस भोसले व पोलीस बोळके हे माझे घरी येऊन माझा भाऊ नितीन यायेकडे मी कुठे आहे याबाबत चौकशी केली.त्यावेळी माझ्या भावाने मी बाहेरगावी गेलो असल्याचे सांगुन काय विषय आहे तो माझेशी बोला असे म्हणाला असता पोलीस भोसले व बोळके यांनी सौदागर याचे विरोधात दाखल गुन्हयातुन तुझ्या भावाचे नाव कमी करायचे असल्यास कुकलारे साहेबांनी पाच लाख रुपये दयायला सांगितले आहेत असे म्हणाले त्यावेळी भावाने आता पैसे नाहीत मी सोमवारी साहेबांना येऊन भेटतो असे सांगितले.त्यानंतर मी घरी फोन केल्यानंतर मला भावाने नमुद घटनेबाबत माहिती देवून कुकलारे साहेबांसाठी पाच लाख रुपये पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी मागितले असुन ते तुला गुन्हयात आरोपी करतील असे म्हणाले आहेत.त्यावेळी मी घाबरुन त्याला ठिक आहे तु सोमवारी पोलीस स्टेशनला जावुन साहेबांना भेट आणि विषय मिटवुन टाक असे म्हणालो. त्यानंतर सोमवार दिनांक 01/09/2025 रोजी माझा भाऊ नितीन व त्याचा मित्र राजेंद्र सोनटक्के हे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता कुकलारे साहेबांनी माझ्या भावाकडे पाच लाख रुपयाची मागणी करुन चार लाख रुपये घेतले.

त्यानंतर दिनांक 15/10/2025 रोजी मला पोलीस भोसले यांनी लोहारा पोलीस स्टेशन येथे बोलाविले असता मी पोलीस स्टेशन येथे गेलो तेथे पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी मला माझ्या मित्राविरुध्द दाखल गुन्हयात सह आरोपी न करण्यासाठी पैशाची मागणी करुन पैसे न दिल्यास आरोपी करतो असे सांगुन कुकलारे साहेबांना देणेसाठी आणखी पाच लाख रुपयाची मागणी केली. सदरवेळी मी त्यांना सध्या माझेकडे पैसे नाहीत याआधी तुम्ही

माझ्याकडुन माझे सोन्याचे कडे घेतले आहे असे बोललो असता त्यांनी तु पाच लाख रुपये दे आणी तुझे कडे घेवुन जा असे बोलुन माझ्याकडे पाच लाख रुपयाची मागणी केली. त्यावर मी त्यांना तुम्हाला नंतर भेटतो असे सांगून तेथून निघुन आलो. त्यानंतर मला भिती वाटल्याने मी सदरची गोष्ट कोणालाही सांगितली नाही. आज दि. 06/11/2025 रोजी पोलीस भोसले,पोलीस बोळके यांनी मला पोलीस स्टेशनमध्ये भेटावयास बोलाविले आहे. मी त्यांना भेटावयास जाणार असुन ते माझेकडे पैशाची मागणी करणार असुन सदरची रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने तसेच मला कुकलारे साहेब, पोलीस भोसले, पोलीस बोळके यांना लाच देण्याची इच्छा नाही. तसेच माझेत व कुकलारे साहेब,पोलीस भोसले, पोलीस बोळके यांचेत कसलाही आर्थिक व्यवहार नसुन भांडण तंटा नाही. माझी त्यांचेविरूध्द तक्रार असून त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती."वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.नारायणकर यांना नमूद लोकसेवक पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब , पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी कधी व कुठे भेटण्यास बोलाविले आहे अशी विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी लोहारा पोलीस स्टेशन येथे बोलावले असुन तेथे जाऊन मी त्यांची भेट घेतो.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.नारायणकर यांचेकडे लोकसेवक पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब , पोलीस भोसले व पोलीस बोळके हे लाच मागणी करतात अगर कसे?याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र.1 म्हणून इलाही मौला मोगल पंच क्र.2 म्हणून निलेश विलास कदम हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 व क्र.02 यांचे निवेदन घेण्याचे ठरल.त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले.व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.त्यानंतर तक्रारदार नारायणकर व पंच क्र.1 मोगल पंच क्र.02 कदम यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 16.36 वा ची होती.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब , लोकसेवक पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले.त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री.नारायणकर यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने पोशि तावरे यांनी लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 मोगल यांचेसह पडताळणीकामी मार्डी गाव,ता.लोहारा येथुन त्यांचे चारचाकी वाहन क्र.एम एच 25 बी ए 9075 मधुन लोहारा पोलीस स्टेशन येथे रवाना केले ती वेळ 17.00 वा ची होती.

त्यानंतर आम्ही सापळा पथक ,पंच क्र.02 असे मार्डी गाव येथे रोडचे एका बाजुस थांबुन राहिलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.29 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.01 मोगल यांना गेल्यापासून येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,लोकसेवक पोलीस भोसले व पोलीस बोळके उपस्थित नव्हते त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन पोलीस बोळके यांचे मोबाईल क्रमांक वर फोन केला असता फोन लागला नाही त्यावेळी तक्रारदार यांनी तेथे उपस्थित असणा-या व्यक्ती यांना पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,लोकसेवक पोलीस भोसले व पोलीस बोळके साहेब कुठे आहेत असे विचारले असता पोलीस भोसले व पोलीस बोळके नसल्याचे सांगितले तसेच कुकलारे साहेब सुट्टीवर असल्याचे सांगितले.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार श्री. नारायणकर यांनी पंच क्र.01 मोगल यांचेप्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,आता रात्र झाली आहे पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचा मला अदयापपर्यंत फोन आला नाही त्यामुळे आज त्यांची भेट होण्याची शक्यता नाही तरी आज रोजीची कारवाई स्थगित करून उदया दि.07/11/2025 रोजी करु असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार यांनी विनंती केले नुसार दि. 06/11/2025 रोजीची कारवाई स्थगित करण्यात

आली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यांनतर दि.07/11/2025 रोजी आम्ही दोन्ही पंच ,पोशि पवार असे खाजगी वाहनातुन व पोलीस निरीक्षक
निंबाळकर व सापळा पथक, आवश्यक साहीत्यासह शासकिय वाहनातुन बुलडाणा अर्बन बँकचे भक्त निवास ,
तुळजापुर येथुन 08.45 वा रवाना होऊन तक्रारदार यांनी सांगितलेप्रमाणे मार्डी गाव येथे 09.30 वा पोहोचलो.त्या
ठिकाणी तक्रारदार हे उपस्थित होते. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी
तक्रारदार यांना पंच क्र.01 मोगल यांचे सह शासकिय रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पडताळणीकामी लोहारा
पोलीस स्टेशन येथे पाठवण्याचे ठरलेने त्यांनतर यापुर्वी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वापरलेले
मेमरी कार्ड तात्पुरते खाकी पाकीटात सिलबंद करुन सुरक्षितरीत्या ठेवले होते.सदर सिलबंद खाकी पाकीटातील
मेमरीकार्ड पंचासमक्ष बाहेर काढुन सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये यापुर्वी ध्वनीमुद्रीत झालेल्या
रेकॉर्डींग फाईल सुरक्षीत असल्याची तक्रारदार, पंच व सापळा पथकास खात्री करुन दिली.त्यानंतर तक्रारदार श्री.
नारायणकर व पंच क्र.1 मोगल व पंच क्र.02 कदम यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 10.19 वा ची होती.
त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच यांना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू
करुन तो पोशि तावरे यांनी तक्रारदार श्री.नारायणकर यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या
सहाय्याने चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01.मोगल यांचेसह 10.32 वा पडताळणीकामी
तक्रारदार यांचेकडील चारचाकी एम एच 25 बी ए 9075 मधुन मार्डी गाव येथुन रवाना केले व आम्ही पथकासह
सदर ठिकाणी शासकिय वाहनात थांबुन राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि
तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 10.56 वा.ची होती. त्यानंतर आम्ही
पंच क्र.01 मोगल यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार
असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस स्टेशन इन्चार्ज एपीआय कुकलारे ,पोलीस
भोसले व पोलीस बोळके पोलीस उपस्थित नव्हते त्यावेळी तक्रारदार यांनी  पोलीस बोळके यांना फोनवर संपर्क
केला असता सदर फोन वरील संभाषणा दरम्यान पोलीस बोळके यांनी ते धाराशीव उस्मानाबाद येथे असल्याचे
सांगुन सोमवारी 11 वाजता या मी पण येतो,जाऊ समोर असे बोलले त्यानंतर तक्रारदार यांनी पोलीस बोळके यांना
"हा...आणि मला एक सांगा साहेब ते त्यांनी कडं कुठं ठेवल्यात.....मजी सोनारापाशी ठेवल्यात का त्यांच्या पाशिच
हे....त्यावर पोलीस बोळके हे "जिम्मेदारी मी घेतल्यावर विषय संपला की कुठं पुरुन का ठेवना...असे बोलले व
सोमवारी सकाळी 11 वाजता येणेस सांगितले.त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेले ठिकाणी परत आलो.
त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.01
मोगल यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,
पोलीस बोळके यांनी मला सोमवारी भेटायला बोलावले आहे त्यामुळे मी सोमवारी पोलीस पोलीस स्टेशन इन्चार्ज
एपीआय कुकलारे ,बोळके व पोहवा भोसले यांची भेट घेतो तरी आज रोजीची कारवाई स्थगित करुन सोमवार दि.
10/11/2025 रोजी करु असे सांगितलेने दि.07/11/2025 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली.सदर
बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.10/11/2025 रोजी पुढील कारवाई करण्याचे ठरलेने आम्ही ,पोशि पवार व दोन्ही पंच असे
खाजगी वाहनाने व पोलीस निरीक्षक निंबाळकर व अंमलदार लाप्रवि पुणे हे त्यांचे शासकिय वाहनाने लोहारा येथे
तक्रारदार श्री.नारायणकर यांचे नातेवाईकांचे घरी लोहारा येथे 09.45 वा चे सुमारास पोहोचलो

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी तक्रारदार यांना पंच क्र.01 मोगल यांचे
सह शासकिय रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पडताळणीकामी लोहारा पोलीस स्टेशन येथे पाठवण्याचे ठरलेने
त्यांनतर यापुर्वी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड तात्पुरते खाकी पाकीटात
सिलबंद करुन सुरक्षितरीत्या ठेवले होते.सदर सिलबंद खाकी पाकीटातील मेमरीकार्ड पंचासमक्ष बाहेर काढुन
त्यांचेकडील सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये यापुर्वी ध्वनीमुद्रीत झालेल्या रेकॉर्डींग फाईल
सुरक्षीत असल्याची तक्रारदार, पंच व सापळा पथकास खात्री करुन दिली.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर व पंच
क्र.1 मोगल व पंच क्र.02 कदम यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 10.21 वा ची होती.त्यानंतर आम्ही
तक्रारदार यांना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करुन तो पोशि तावरे
यांनी तक्रारदार श्री.नारायणकर यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने चालु करुन
लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01.मोगल यांचेसह 10.36 वा पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील

चारचाकी एम एच 25 बी ए 9075 मधुन तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घर लोहारा गाव येथुन रवाना केले व आम्ही पथकासह सदर ठिकाणी थांबुन राहीलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 11.12 वा.ची होती.

त्यानंतर मी पंच क्र.01 मोगल यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस भोसले व पोलीस बोळके पोलीस उपस्थित होते त्यावेळी तक्रारदार यांनी पोलीस बोळके यांची भेट घेतली सदर भेटी दरम्यान तक्रारदार व पोलीस बोळके यांची कामासंदर्भात चर्चा झाली सदर चर्चा दरम्यान पोलीस बोळके यांना "कस....कस करायच सांगा त्या पध्दतीने पट म्हणून मोकळ व्हाव उग जिकड-तिकड उग चर्चाला कारण.. कस होत माहितीय का..विष्णु आं.. एव्हड पैसे दिला ..कड दिला ...तुम्हाला सांग तु साहेब मी...तुमच्यावर विश्वास ठुला म्हणून कड काढून दिलो नाहीतर हयांनला दिलो असतो का?त्यावर पोलीस बोळके हे "हे नाई" असे बोलले त्यावर तक्रारदार हे पोलीस बोळके यांना "मी काय सांगायलो तुम्ही मला अं..कड दुसरीकडे ठिवायचय"असे बोलले असता पोलरस बोळके हे "दुसरीकड ठेवा नाहीतर पुरुन टाका..आमच कामाय तुम्हाला पोच करायच..चिमटा घ्यायचा..आं"असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे "एकदा बोलून घ्या म्हजी"असे म्हणले "त्यावर बोलतो चार वाजता" असे बोलून तक्रारदार यांना चार वाजता बोलावले.त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आले असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.01 मोगल यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी ,पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.

त्यानंतर तक्रारदार यांना मी पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस बोळके यांनी मला 16.00 वाजता भेटायला बोलावले आहे परंतु मी 15.30 वाजता पोलीस बोळके व पोहवा भोसले तसेच पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब यांची भेट घेतो म्हणजे ते सर्व जण मला भेटतील असे तक्रारदार यांनी सांगितले त्यानंतर थोड्या वेळाने तक्रारदार व पंच यांना सुचनांची उजळणी करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लावनु दिला व पोलीस स्टेशन लोहारा येथे पोलीस भोसले ,पोलीस बोळके ,पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे यांचेकडे तक्रारदार यांचे नातेवाईकाचे घर लोहारा येथुन पडताळणीकामी रवाना केले ती वेळ 15.29 वा ची होती व सदर ठिकाणी पंच क्र.02 कदम व सापळा पथक थांबुन राहीलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 17.35 वा.ची होती.

त्यानंतर आम्ही पंच क्र.01 मोगल यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी बोळके पोलीस उपस्थित नव्हते त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9763113302 वरुन बोळके यांचे मोबाइल क्रमांक 9822084587 वर फोन केला असता पोलीस बोळके यांनी दहा पंधरा मिनीटात येतो असे सांगितले.त्यानंतर थोडया वेळाने पोलीस बोळके तेथे आले व तुमचा काम झाल्या शिवाय जाणार नाय असे बोलले व तेथुन निघुन गेले त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस माळी आले त्यावर तक्रारदार यांनी पोलीस माळी यांना "तीन घंटे झाले बोळके मेजर नी बसवलीय" असे बोललो असता त्यावर ते किती राहले आता.....किती राहिलेते? किती दिले किती राहिले असे पोलीस माळी यांनी विचारले असता त्यावर तक्रारदार त्यांना "आता त्यांनीच सांगायच ....मी.काहीच बोलन नाय. असे बोलले असता पोलीस माळी तक्रारदार यांना "व्यवहार तुमचा काय झालाय काय नाय...दिसले मला जाता जाता म्हनुन म्हणल असे बोलले. यावर तक्रारदार त्यांना तुम्हाला माहित आहे हे डबल चाललयं साहेब, साहेबाला तुमचा पोहचल्यात पहिले हयाच्या पहिले असे बोलले असता तक्रारदार पोलीस माळी यांना "अहो मी काय म्हणायलो तुमच्या ठिकाण यायला का तुमचा व्यवहार आहे वाटत ना बोळके साहेबांचा ....अनं तुमचा" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे पोलीस माळी यांना "नाय ते नाही कड्यांच" असे म्हणाले असता,ते काय माहित नाय मला असे पोलीस माळी बोलले व निघुन गेले.त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस बोळके आले त्यावेळी तक्रारदार पोलीस बोळके यांना "आता काय तुमचीच वाट बघत बसलोय..असे बोलले त्यावर "माझ काय नाही..मी सांगितलय..तर आता फोन आला का, लगेच तुमच्या तुमाला एक फोन येतय तीथ जाउन करा मग."असे पोलीस बोळके तक्रारदार यांना म्हणाले.त्यावेळी पोलीस भोसले तक्रारदार यांना "जाणुन-बुजुन करायलाय काय,सांगितल ना आठ वाजेपर्यंत फोन येईल म्हणुन, बिलकुल येईल, वार-वार हिकड येवुन" नाही आला फोन तर उद्या सकाळी येईल कळल का ? असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी पोलीस भोसले यांना माझी अडचणय असे सांगितले असता "एकदा सांगितल ना

तिथ उभारुन आठ वाजता फोन येईल म्हणुन..बार-बार यायच आणि बगत उभा राहायच तसल करु नका..जी झाकुन ठेवायच असतय ती उघड करायच नसतय..कवा बी..", ज्या माणसाकड गेलताव तेजाच फोन येईल कळल का.. असे पोलीस भोसले तक्रारदार यांना म्हणाले.त्यानंतर साहेब आहेत का? असे पोलीस बोळके यांना तक्रारदार यांनी विचारले असता "त्यावर आलेत की सकाळीच. गेलेत व्हीजीटला.. मी फोन करतो तुमाला किती वाजेपर्यंत वाट बघणार फोनची आट वाजेपर्यंत म्हणलय ना..म्हणल का नाही बर ठिकाय नकू..काय फरक पडालाय असे बोलले.त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.01 मोगल यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर व मी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली. त्यानंतर तक्रारदार यांना मी पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस बोळके व पोलीस भोसले यांनी आठ वाजता फोन येईल असे सांगितले आहे.त्यांच्या फोन ची वाट पाहु त्यांचा फोन आला नाही तर मी पोलीस स्टेशन येथे जाऊन पोलीस बोळके व पोलीस भोसले व पोलीस स्टेशन इन्चार्ज यांची भेट घेतो असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितले की,पंच क्र.1 हे माझे बरोबर ब-याच वेळा आले असुन त्यांचा पोलीसांना संशय येण्याची शक्यता आहे तरी आता पंच क्र.02 कदम यांना माझे सोबत पाठवा अशी विनंती केलेने त्यांचे सोबत पडताळणीकामी पंच क्र.02 कदम यांना पाठविण्याचे व पंच क्र.01 मोगल हे सापळा पथकासोबत थांबतील असे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. नारायणकर व आम्हा पंचांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 20.25 वा ची होती. त्यानंतर थोड्या वेळाने तक्रारदार व पंच यांना सुचनांची उजळणी करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पोशि तावरे यांनी लावनु दिला व पोलीस स्टेशनचे इन्चार्ज ए.पी.आय कुकलारे साहेब ,पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचेकडे पडताळणीकानी लोहारा पोलीस स्टेशन येथे रवाना केले ती वेळ 20.38 वा ची होती. पंचापैकी मोगल व मी , सापळा पथक असे तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घरी लोहारा येथे थांबुन राहीलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.02 कदम असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 22.05 वा.ची होती.

त्यानंतर मी तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व पंच असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब पोलीस भोसले,पोलीस बोळके व पोलीस तिगाडे उपस्थित होते. त्यावेळी तिघाडे पोलीस तेथे आले व हित काय आहे असे विचारले असता त्यावेळी मी साहेबाला भेटायचय असे बोललो.त्यानंतर तेथे पोलीस भोसले आले त्यावेळी मी त्यांना हे आस करून नका भोसले साहेब तुमच्या पाया पडतो...आस बेजार करु नका...खरच पाया पडतो" असे बोललो त्यावर पोलीस भोसले हे "राजभाऊ सोनटक्केचा फोन ईन तुम्हाला" असे बोलले.त्यावर मी त्यांना मी तुम्हाला दिलय साहेब कड असे बोलले असता त्यावर भोसले पोलीस बोलले की, "हो ना मग मी डायकी जिम्मेदार का टेन्शन घेताय" त्यावर मी त्यांना पोलीस भोसले यांना "की व्हाय बघा बारी क हाय सांगा आज एक लाख वीस हजार किंमतय साहेब...बारालाखाची वस्तु मी तुम्हाला शुन्य मिनिटात दिलेय दहा तोळ्याच सोन्याच कड...लोकांना गुंज बी मिळता येईना कुणाला" असे बोलले.त्यावर भोसले पोलीस हे "मिळून जाईन तुझ तुमची वस्तु तुम्हाला" असे बोलले त्यावर मी त्यांना "नाय हाय म्हणून ...साहेब आज तागायत मी तुमच्यावर विश्वास होता म्हणून अक्षरशा दहा तोळ्याच सोन्याच कड दिलो ना खाट म्हणून काढून दिल का नाय काढून असे बोललो."त्यावर पोलीस भोसले हे "हाय का गेला विश्वास" असे बोलले त्यावर पोलीस तिघाडे हे "अहो एवढ काय सांगा ना ते देतील की मंग" असे बोलले.त्यावर मी "अहो तिघाडे साहेब देतील पण मला काय म्हणायचय." असे म्हणालो त्यावर पोलीस भोसले "ती गोष्ट...इकड ऐका पहिल माझ गोष्ट कशी रहाते झाकली मुठ सव्वा लाखाची रहाते" असे म्हणाले असता आवो असलाय म्हणून मी बोललो का कुणाला मी असे बोलले.त्यानंतर पोलीस भोसले "आता व्यवहार बोलायचा नाही तोंडातुन आला नाही पाहिजे" असे बोलले.त्यावर मी पोलीस भोसले यांना "मी डायरेक्ट दिलय साहेब तुम्हाला"असे म्हणालो असता त्यावर भोसले पोलीस "होय की मग...तुम्हाला मग ईन ना तिथुन" उदया क्लिअर होवून जाईन बाराच्या आत आम्हाला काही तरी गोष्टी राहल्यात...सांगाव लागतय..ह्योका केल बगा क्लिअर...हिकडून दबावय ठिकय झाल का त्याच दिवून टाक. काय ती आता तुमच हाय की पहिलच सांगितलय की तुम्हाला ...तुमच ती वस्तु मिळली की...तुम्हाला किती दयायच्यात काय ती तुमच तुम्हाला माहित आहे की असे बोलले त्यावर मी पोलीस भोसले यांना "नाही तुम्ही मला एक सांगा पैसे कमी असल्यावर घेणार का? असे म्हणालो त्यावर पोलीस भोसले "तुम्ही बोलू नका व्यवहार बोलून बोलून गोल गोल करालाव का मला" असे म्हणाले. त्यावर मी माझा त्या गुन्हयात

काय संबंध नसताना सुध्दा मी एका मिनिटात काढून दिला" असे बोललो.त्यावर पोलीस भोसले आता अजुन तुम्ही भरकटलाय असे म्हणाले. त्यांनतर मी सपोनि कुकलारे यांचे केबिनमध्ये प्रवेश केला त्यावेळी सदर केबीनचे आतमध्ये लोकसेवक भोसले व तिघाडे हे पण आले सदर वेळी पंच क्र.2 यांना पोलीस भोसले यांनी हाताने बाहेर थांबणेस सांगितले त्यावेळी पंच 2 कदम हे सदर केबिनचे दरवाज्याचे जवळ आम्ही सर्वजण दिसेल असे उभे राहीले व आमचे संभाषण ऐकुन राहीले. त्यानंतर मी एपीआय कुकलारे साहेब यांना "सर तुमच्या पाया पडतो काय चुकल असल तर बघा मला आठ दिवस झाले परेशान करू लागलेत देतो देतो"असे म्हणाले .त्यावर सपोनि कुकलारे "कोण" असे म्हनाले त्यावर मी सगळेच...तो विषय दिलाच नाही.तिन आत्महत्या केल्यावर परत माझही सगळ एकतर घरात साहेब सगळयांनी मिळून मला ती कड घातल होत असे बोललो.त्यावर एपीआय कुकलारे साहेब "हंमम" असे म्हणाले. त्यावर मी "मला कायेय ती सांगा म्हणाललते..आण बर मी काय आसल ती करायला बी तयार आहे ना काय तुम्ही मी एका मिनिटात काढून दिलय साहेब हे विचारा हयांना (लोकसेवक भोसले यांचेकडे पाहून) असे म्हणालो. त्यावर एपीआय कुकलारे "हंमम...काय ती क्लिअर करून टाका" असे म्हणाले. त्यावर मी म्हणालो बर त्या गुन्हयात माझा काय तरी संबंध हाय का तीन मरणाच मरून गेली पण साहेब तस नाही उदया घटना पण मी बी त्या दिवशी तुम्हाला काय म्हणल साहेब डीवायएसपी साहेब तीन आत्महत्याच केली"त्यावर एपीआय म्हणाले "हाड फेॅवचर झाल नसत पण क्लिअर कट राहील असत ना हॅंगिंग सगळ डिस्ट्रॉय झाल्यामुळ प्रॉब्लेम झाला ना आता तो" त्यावरन मी,हायला नाय साहेब ती तुम्ही फोन केला मला घटना घडल्या घडल्या ती सौदा मला हित बोलवायला आला माळी साहेबांन मला माळी साहेब, राठोड साहेब तुम्ही जावा म्हणाले मला पाठविले अण पुन्हा सगळ ती भोगायची वेळ येवू लाली साहेब असे म्हणाले त्यावर पोलीस भोसले "आता झाल की सगळ"असे म्हणाले असता मी त्यांना "आणि साहेब अजून एक सांगु नाही साहेबाला कानावर पाहिजेन..चार्जशीट मध्ये तुझ नाव घालतो ही कुठली पध्दत साहेब"असे बोललो.त्यावर एपीआय कुकलारे हे "कोण म्हणाल"? आर तु मला विचारयच ...तपास अधिकारी मी ये का कोणय? असे म्हणाले. त्यावर मी "आणि एक साहेब मजे तुम्हाला काय बी सांगितलाव..लय का होवू नये.. लय काय होवू नये" त्यावर पोलीस भोसले हे "बोलतिल तिघाडे साहेब सकाळी" असे म्हणाले.त्यावर तिघाडे हे "बोल मी बोलता सकाळी" असे म्हणाले.त्यावर पोलीस भोसले हे तिघाडे साहेबाकडे जाया ,माझ्याकड या असे म्हणाले.त्यावर तिघाडे "माझ्यापाशी अकरा वाजता या" असे म्हणाले त्यानंतर साक्षीदार केलं व तुम्हाला त्याच्यातं असे एपीआय कुकलारे बोलले असता मी "अवं साक्षीदार फिक्षीदार काय घेवु नका असे म्हणाले असता "येडायंका मेन साक्षीदार ..मेन तुम्हीच मुख्य साक्षीदार" असे एपीआय कुकलारे बोलले.सदर संभाषणा दरम्यान मी "हा आणि ते एकदा सांगा अन मला काय म्हणायचं साहेब राजाभाऊ ने जे दिलं मागं, नितीनने जे दिलं होतं ते पोहचेललं नाय का ते मधीच हाणा आता"असे बोलुन आता तिघाडे साहेबांना भेटू का भोसले साहेबांना असे म्हणाले असता "कोणला भेटायचं भेटा" असे एपीआय कुकलारे बोलले.त्यावर मी त्यांना "हां मग मी करतो लय होवू नये पहिलं नितीनने जे चार लाख रूपये दिले आता"असे म्हणालो त्यावर एपीआय कुकलारे "हां" असे बोलले..व एपीआय कुकलारे , पोलीस भोसले आणि तिघाडे हे त्यांचे केबीनचे बाहेर चालत येऊ लागले मी ही त्यांचे बरोबर बाहेर येत असताना पंच क्र.02 कदम यांनी कुकलारे यांना टाईम विचारला त्यानंतर मी "किती देवू? असे एपीआय कुकलारे यांना विचारुन मी "तीन लाख दिलें" असे मी म्हणालो असता त्यावर एपीआय कुकलारे "हां" असे बोलले.त्यावर परत मी "साहेब तीन लाख रुपये..म्हणजे ते पहिल दिलेलं"असे बोललो त्यावर पोलीस तिघाडे "ते तीन लाख रुपये..तेला दिलेलं.." असे मी त्यांना बोललो त्यावर मी त्यांना "फक्त दोन लाख रुपये तेवढ द्यायचेत..म्हणजे ती उद्या ती माणुस हेणला त्या माणसा सारखाच बोलताय परत." आता नितीनं मला चार लाख रुपये डायरेक्ट दिल ते नितीन दिल का राजाभाऊ न दिल ते मला माहित नाही. ती परस्थितीपण मला माहित नाही.असे मी म्हणालो असता "तीन भेटले दोन आता देवुन टाकायचे देवून टाक.. विषय मोकळ हो."असे बोलुन एपीआय कुकलारे यांनी यापुर्वी 03 लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन परत माझेकडे 02 लाख रुपये लाच मागणी करुन सदर लाच रक्कम पोलीस तिघाडे किंवा पोलीस भोसले यांचेकडे देणेस सांगितले.याप्रमाणे पोलीस भोसले आणि पोलीस बोळके यांनी यापुर्वी माझेकडुन घेतलेले 10 तोळे सोन्याचे कडे घेतलेचे मान्य करुन एपीआय कुकलारे यांनी मागणी केलेली 02 लाख रुपये लाच रक्कम घेऊन मला सकाळी 11.00 वाजता बोलावले आहे.त्यानंतर मी व पंच कदम असे आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.सदर पडताळणी कारवाई दरम्यान पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचेशी संभाषणा दरम्यान पंच श्री.कदम हे माझे बरोबर होते. अशा वर्णनाची हकिकत तक्रारदार यांनी सांगितली त्यानंतर मी पंच कदम यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.2 कदम यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार श्री.विष्णु भिमराव नारायणकर ,रा.लोहरा यांनी दि.06/11/2025 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.06/11/2025,07/11/2025 व दि.10/11/2025 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे मित्राविरुध्द लोहारा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयात तक्रारदार यांना सहआरोपी न करणेसाठी तक्रारदाराकडे यापुर्वी एपीआय कुकलारे यांचेकरीता पोलीस भोसले व बोळके यांनी पाच लाख रुपयाची मागणी केली होती त्यावेळी तक्रारदाराकडे पाच लाख रुपये नसलेने तक्रारदाराने त्याचे हातातील 10 तोळे सोन्याचे कडे काढुन दिले होते.सदरचे कडे पोलीस भोसले व बोळके यांनी तक्रारदाराकडे यापुर्वी मागणी केलेले पैसे आणुन देई पर्यंत स्वत:कडे ठेऊन घेतल्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले तसेच लोहारा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी एपीआय कुकलारे यांचेकडे सदर गुन्हयाचा तपास असुन सदर गुन्हयात तक्रारदार यांना सहआरोपी न करणेसाठी त्यांनी पडताळणी कारवाई मध्ये तक्रारदाराच्या भावाकडुन यापुर्वी तीन लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन तक्रारदाराकडे आणखी दोन लाख रुपयाची लाच मागणी करुन पोलीस भोसले किंवा तिघाडे यांचेकडे देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की एपीआय कुकलारे यांनी मागणी केलेली लाच रक्कम घेऊन पोलीस भोसले व पोलीस तिघाडे यांनी मला उदया दि. 11/11/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता बोलावले आहे.त्यामुळे आज 10/11/2025 रोजी कारवाई स्थगित करण्यात यावी अशी विनंती केलेने दि.10/11/2025 रोजी ची कारवाई स्थगित करुन पुढील सापळा कारवाई दि.11/11/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर तक्रारदार यांना सदर कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत व दि.11/11/2025 रोजी तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घर लोहारा येथे सकाळी 09.00 वा लाच रक्कम 2,00,000/- रुपये येणेबाबत सुचना देऊन निवासस्थानी रवाना केले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.11/11/2025 रोजी आम्ही तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घर लोहारा येथे उपस्थित असताना दि. 10/11/2025 रोजी दिलेल्या सुचनेनुसार तक्रारदार सकाळी 09.00 वाजता हजर झाले त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार नारायणकर यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार नारायणकर यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 2,00,000/- रुपये हजर केले.त्यानंतर मपोहवा काळे पोशि आडके यांनी नमुद नोटांचे नंबर कागदावर लिहून काढले.
त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम" जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये प्रथम तक्रारदार नारायणकर त्यानंतर पंच क्र.01 श्री. मोगल व पंच क्र.02 कदम यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 10.32 वा ची होती. सदर वेळी तक्रारदार यांच्या मोबाईल फोनवर अनोळखी नंबर 9226335035 वरुन फोन येऊन गेला असल्याचे सांगितले असता तात्काळ तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक 9763113302 वरुन त्या अनोळखी नंबर वर फोन करण्याचे ठरवुन सदर फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डवर रेकॉर्ड करण्याचे ठरवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु केला व त्या अनोळखी नंबरवर फोन लावला ती वेळ 11.14 वा ची होती.सदर संभाषणा दरम्यान अनोळखी नंबरवरुन पोलीस भोसले हे बोलत असल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. पोलीस भोसले हे उमरग्याला चाललोय मी येतो थोडया वेळात घेवुन येतो आलो की फोन करतो ,मी तुम्हाला इकडुन निघालो की फोन करतो असे म्हणाले त्यानंतर सदर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.त्यानंतर 14.30 वा चे सुमारास आम्ही घरामध्ये दारे खिडक्या बंद करुन कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार नारायणकर यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी करुन दाखवले.त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेले लाचेकामी वापरण्याची रक्कम पोहवा/काळे यांना अँन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, मपोहवा/2008 काळे यांनी कापसाच्या बोळ्याने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस तसेच लिफाफायास आतुन बाहेरुन अँन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर मपोहवा/2008 काळे यांनी सदर लाचेची रक्कम रुपये 2,00,000/- तक्रारदार नारायणकर यांच्या नेसणीस असलेल्या निळ्या रंगाची जिन्स ची पॅन्टच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशात ठेवली.त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.त्यान्तर पोलीस भोसले यांच्या फोनची वाट पाहत थांबले.परंतु पोलीस भोसले यांचा फोन न आल्याने तक्रारदार यांचे वरील मोबाईल क्रमांकावरुन पोलीस तिघाडे यांच्या मोबाईल क्रमांक 9130759247 वर फोन केला व सदर फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ध्वनीमुद्रीत केला ती वेळ 15.19

वा ची होती. सदर फोन कॉल संभाषणा दरम्यान पोलीस तिघाडे यांनी ते भातगळयाला कार्यक्रम नायका तिथं आलतो जरा कार्यक्रमामध्ये , तिकडुन आल्यावर फोन करतो असे म्हणाले असता तक्रारदार त्यांना मग मग मी येवु का तिकडं शेताकड येताना असे बोलले व फोन कट केला.त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर एपीआय कुकलारे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना पंच क्र.02 कदम यांचेसह भातागळी येथे त्यांची हिरो होंडा दुचाकी क्र.एम.एच-29 बी एस 6015 पाठविणेचे ठरले व पंच क्र.01 पोलीस निरीक्षक निंबाळकर ,मपोहवा गोरे पोशि तावरे असे शासकिय वाहनामधुन तक्रारदार यांचे वाहनामागे रवाना होतील व मी,पोशि आडके व पोशि पवार असे पोलीस स्टेशन पासुन काही अंतरावर खाजगी वाहनामध्ये थांबुन राहतील व पोलीस तिघाडे यांनी लाच रक्कम स्विकारले नंतर व पोलीस तिघाडे यांना ताब्यात घेतले नंतर मला दुरध्वनीवरुन कळवतील असे सर्वानुमते ठरविणेत आले.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आत लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.02 कदम यांचे सह 15.45 वा.चे सुमारास त्यांचे दुचाकी वरुन रवाना केले.त्यांचे पाठोपाठ पंच क्र.01 पोलीस निरीक्षक निंबाळकर ,मपोहवा गोरे पोशि तावरे असे शासकिय वाहनामधुन रवाना केले व मी , पोशि पवार ,पोशि आडके यांचेसह लोहारा पोलीस स्टेशन येथील काही अंतरावर कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबुन राहीले.त्यानंतर 19.00 वा चे सुमारास पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी आम्हास कळविले की, पोलीस तिघाडे यांनी लाच रकमेचा स्विकार केल्याने त्यांना ताब्यात घेतले असुन पुढील कायदेशिर प्रक्रिया करुन त्यांना पोलीस स्टेशन येथे घेऊन येत आहोत.त्यानंतर आम्ही लोहारा पोलीस स्टेशन येथे जाऊन एपीआय कुकलारे यांचे केबीनमध्ये जाऊन त्यांना ताब्यात घेतले व त्यानंतर पोलीस बोळके ,पोलीस भोसले यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर थोडया वेळात पोलीस निरीक्षक निंबाळकर हे पोलीस तिघाडे यांना घेऊन पथकासह पोलीस स्टेशन येथे आले त्यावेळी त्यांनी सांगितले की,तक्रारदार व पंच यांना सापळा कारवाई कामी रवाना केलेनंतर त्यांचे पाठोपाठ आम्ही रवाना होऊन भातागळी गावामध्ये तक्रारदार यांचे शेतामध्ये जाऊन शासकिय वाहन थांबवले व तक्रारदार , पंच व पोलीस तिघाडे दृष्टीस दिसतील अशा प्रकारे तक्रारदार यांचे लाच स्विकारले नंतरच्या पुर्व नियोजीत इशा-याची वाट पाहत थांबुन राहीलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथक असे तक्रारदार यांचे शेतात जाऊन पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 18.56 वा ची होती. त्यानंतर यापुर्वी सुचना दिलेप्रमाणे मपोहवा गोरे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले.त्यानंतर पोलीस तिघाडे यांचे दोन्ही हात पोशि तावरे यांनी घट्ट पकडुन पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर पंच कदम यांना पोलीस तिघाडे यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता पंच कदम यांनी सांगितले की, पालीस तिघाडे यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेली लाच रक्कम ही त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशामध्ये ठेवली आहे. त्यानंतर पोलीस तिघाडे यांना पंचासमक्ष लाच रकमेबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशामध्ये लाच रक्कम असलेबाबत सांगितले व लाच रक्कम काढुन दिली.त्यानंतर टॉर्चच्या प्रकाशात आम्ही पंच क्र.01 मोगल यांना पोलीस तिघाडे यांनी काढुन दिलेल्या लाच रकमेतील नोटांचे नंबर आणि पंच क्र.01 मोगल यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले त्याप्रमाणे पंच क्र.01 मोगल यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले व सदर लाच रक्कम मोजुन पाहीली असता ती दोन लाख रुपये असल्याचे आढळुन आली.त्यानंतर सायंकाळची ची वेळ असल्याने अंधार पडल्याने अंधारामध्ये पोलीस तिघाडे यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम त्यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता पोलीस तिघाडे यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस ,बोटांच्या पे-यावर निळसर चकाकी दिसुन आली.तसेच त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशास अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली..तसेच पंच क्र.01 मोगल यांचे हातासही अॅन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.सदर वेळी पोलीस तिघाडे यांची अंगझडती घेण्यात आली सदर वेळी पुर्व सुचना दिलेनुसार मपोहवा गोरे यांनी सदर कारवाईचे व्हिडीओ रेकॉर्डींग केले.त्यानंतर पोलीस तिघाडे यांना शासकिय वाहनामध्ये घेऊन लोहारा पोलीस स्टेशन येथे आलो असे पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी सांगितले.

तरी तक्रारदार श्री.विष्णु भिमराव नारायणकर ,रा.लोहारा यांनी दि.06/11/2025 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.06/11/2025,07/11/2025 व दि.10/11/2025 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे मित्राविरुध्द लोहारा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यात तक्रारदार यांना सहआरोपी न करणेसाठी तक्रारदाराकडे यापुर्वी एपीआय कुकलारे यांचेकरीता पोलीस भोसले व बोळके यांनी पाच लाख रुपयाची मागणी केली होती त्यावेळी तक्रारदाराकडे पाच लाख रुपये नसलेने तक्रारदाराने त्याचे हातातील 10 तोळे सोन्याचे

कडे काढुन दिले होते.सदरचे कडे पोलीस भोसले व बोळके यांनी तक्रारदाराकडे यापुर्वी मागणी केलेले पैसे आणुन देई पर्यंत स्वत:कडे ठेऊन घेतल्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले तसेच लोहारा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी एपीआय कुकलारे यांचेकडे सदर गुन्हयाचा तपास असुन सदर गुन्हयात तक्रारदार यांना सहआरोपी न करणेसाठी त्यांनी पडताळणी कारवाई मध्ये तक्रारदाराच्या भावाकडुन यापुर्वी तीन लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन तक्रारदाराकडे आणखी दोन लाख रुपयाची लाच मागणी करुन पोलीस भोसले किंवा तिघाडे यांचेकडे देण्यास सांगितले व दि.11/11/2025 रोजी पोलीस अर्जुन शिवाजी तिघाडे पोलीस नाईक 1595 यांनी पंचासमक्ष 200000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार विष्णु भिमराव नारायणकर यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी 1) ज्ञानेश्वर भिमराज कुकलारे वय-43 वर्षे पद -सहायक पोलीस निरीक्षक,लोहारा पोलीस स्टेशन ता.लोहारा जि. धाराशिव 2) सपोफौ निवृत्ती बळीराम बोळके वय-57 वर्षे लोहारा पोलीस स्टेशन 3) श्री.आकाश मधुकर भोसले वय-32 वर्षे पोशि /135 लोहारा पोलीस स्टेशन 4) अर्जुन शिवाजी तिघाडे वय-34 वर्षे पोना नेमणुक लोहारा पोलिस स्टेशन व यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7,7अ,12 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला....

सदर गुन्ह्याचा पुढील तपास, श्री.बाळासाहेब नरवटे ,पोलीस निरीक्षक ,लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,धाराशिव.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SACHIN DIGAMBAR KENDRE

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSI

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

12/11/25

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

Name (नाव): Dnyaneshwar Bhimr
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): API

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.लोहारा जि.उस्मानाबाद

**फिर्याद** तारीख १२.११.२०२५

मी प्रशांत रामचंद्र चौगुले ,वय-४३ वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापुर मो.नं.९८२३२२५४६५

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापुर येथे पोलीस उप अधिक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि.०६/११/२०२५ रोजी आम्ही आमचे कार्यालयात उपस्थित असताना आमचे पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र यांनी आम्हास फोन द्वारे कळविले की तक्रारदार श्री.विष्णु भिमराव नारायणकर रा. ठि. विरशैव्य ककाया नगर, सुंदर निवास लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव यांची लाच मागणी होत असले बाबतची तक्रार देणेसाठी मा.महासंचालक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य,मुबई यांचे कार्यालयात गेले असता त्यांना पोलीस अधिक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय पुणे येथे भेटुन तक्रार देणेस सांगितले असून आपण सदर तक्रारदार यांना त्यांचे राहते गावी भेटुन त्यांची तक्रार ऐकुण घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित करुन तक्रारदार यांचा मोबाईल क्रमांक दिला व पुढील कारवाईसाठी, पोलीस निरीक्षक निंबाळकर, लाप्रवि पुणे मपोहवा/७९०१ गोरे व पोशि/२८४५ आडके ,मपोहवा/२००८ काळे ,पोशि/१९६६ प्रविण तावरे व शासकिय वाहन एम.एच.१२ यु सी ४१०९ व चालक पोहवा कदम सर्व नेमणुक लाप्रवि पुणे हे मदत कामी दिले असल्याचे व ते ०६/११/२०२५ रोजी १५.००वा पर्यत मार्डी गाव ,लोहारा तालुका येथे आपणास भेटतील असे सांगितले. त्यांनतर आम्ही तहसिल कार्यालय,उत्तर सोलापुर यांना पंच मिळणेकामी पत्र व्यवहार केला असता १३.०० वा चे सुमारास पंच १)श्री.इलाही मौला मोगल ,महसुल सहायक ,तहसिल कार्यालय,उत्तर सोलापुर,२)श्री.निलेश विलास कदम ,ग्राम महसुल अधिकारी नेमणुक तहसिल कर्यालय उत्तर सोलापुर असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सोलापुर येथे आमचे कक्षात हजर झाले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की,तक्रारदार यांनी मार्डी गाव,लोहारा येथे बोलावले असल्याचे सांगुन पोशि/८६२ पवार ,दोन्ही पंच असे खाजगी चारचाकी वाहनाने सोलापुर लाप्रवि कार्यालय येथुन रवाना होऊन तुळजापुर मार्गे मार्डी गाव येथे पोहोचलो ती वेळ १५.३० वा ची होती. सदर ठिकाणी तक्रारदार उपस्थित होते. त्यानंतर थोडया वेळात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथील पथक आले त्यावेळी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथील पथकातील अधिकारी व अंमलदार यांची तसेच तक्रारदार व दोन्ही पंच यांची एकमेकांची ओळख करुन दिली व घेतली.

त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. विष्णू भिमराव नारायणकर यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.१ म्हणून इलाही मौला मोगल पंच क्र.२ म्हणून निलेश विलास कदम हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे.

तक्रारदार श्री. विष्णू भिमराव नारायणकर, वय ३२ वर्षे, धंदा शेती रा. ठि. विरशैव्य ककाया नगर, सुंदर निवास लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव मो. नं. ९७६३११३३०२

"मी श्री.विष्णु भिमराव नारायणकर,वय ३२ वर्षे रा. ठि. विरशैव्य ककाया नगर, सुंदर निवास लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे परीवारासह राहणेस आहे. मी शेती करतो व त्यावर माझे परीवाराचा उदरनिर्वाह चालतो. दि. २५/०८/२०२५ रोजी माझा मित्र सौदागर सुरेश रणशूर याचा मला फोन आला व त्याने मला त्याचे घरी बोलावून घेतले व त्यावेळी त्याने मला सांगिले की त्याची आई त्याचेशी व त्याचे बायकोशी भांडण करत आहे. त्यावेळी मी त्या सर्वांची समजुत घालून भांडण सोडविले व तेथून निघुन गेलो. त्यानंतर थोडया वेळाने मी माझ्या कामानिमित्त लोहारा पोलीस स्टेशन येथे असताना माझा मित्र सौदागर तिथे आला व त्याने सांगितले

प्रच
12/11/25

की, त्याचे आईने घराचे दार आतून लावून घेतले आहे व ती उघडत नाही तु माझे सोबत चल असे सांगितल्याने मी सदर गोष्ट पोलीसांना सांगुन तेथून माझा मित्र सौदागर याचे सोबत त्याचे घरी गेलो त्यावेळी त्याचे बेडरूमचे दार आतून बंद होते.मी माझा मित्र सौदागर,त्याचे वडील व इतर लोकांनी बेडरुमचे बंद दार तोडले असता आतमध्ये सौदागर याच्या आईने गळफास घेतला होता. त्यावळी सौदागर व त्याच्य वडीलांनी सौदागर याच्या आईला खाली उतरवले. त्यानंतर थोडया वेळाने तिथे पोलीस आले व पुढील कारवाई करण्यात आली.

दिनांक २६/०८/२०२५ रोजी दुपारी पोलीस भोसले यांनी मला लोहारा पोलीस स्टेशन येथे बोलाविल्याने मी लगेच लोहारा पोलीस स्टेशन येथे गेलो त्यावेळी पोलीस भोसले यांनी मला पोलीस स्टेशनचे इन्चार्ज कुकलारे साहेब यांचे केबीनमध्ये घेवुन गेले तेथे कुकलारे साहेब यांनी मला मित्र सौदागर याचे घरात झालेल्या घटने बाबत विचारले त्यावर मी त्यांना त्या घडलेल्या घटनेची संपुर्ण माहीती सांगितली त्यावर त्यांनी मला बाहेर थांबा असे सांगितले असता मी त्यांचे केबीनचे बाहेर येवुन थांबलो त्यावेळी पोलीस भोसले यांनी मला सांगितले की, माझा मित्र सौदागर व त्याच्या पत्नीविरोधात सौदागर याचा भाऊ महेश रणशुर याचे तक्रारीवरुन लोहारा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयात तुमचा सहभाग असुन यामध्ये तुम्हाला आरोपी करायचे नसल्यास आम्हाला पाच लाख रूपये द्यावे लागतील असे साहेबांनी सांगितले आहे.तरी तुम्ही १० मिनीटात सदरचे पैसे द्या असे म्हणून माझेकडे पाच लाख रूपयाची मागणी केली. सदरवेळी माझेकडे पैसे नसल्याने मी माझे हातातील १० तोळे सोन्याचे कडे काढून पोलीस भोसले यांचेकडे दिले.. त्यावेळी तेथे पोलीस बोळके हे उपस्थित होते.त्यानंतर रात्री १०.०० वा. सुमारास माझा मित्र सौदागर व त्याच्या पत्नीविरोधात गुन्हा नंबर २५२/२०२५ प्रमाणे दाखल करुन त्यांना थांबवुन ठेवले व मला तेथून सोडुन दिले. त्यानंतर दिनांक २९/०८/२०२५ रोजी पोलीस भोसले, पोलीस बोळके हे माझे घरी येवुन मला म्हणाले की,त्या गुन्हयाचा तपास कुकलारे साहेब करीत असुन तुम्हाला साहेबांनी पोलीस स्टेशनला बोलविले आहे.मी त्यांना ठिक आहे असे म्हणुन मी पोलीस स्टेशनला गेलोच नाही.त्यानंतर दुसऱ्या दिवशी दिनांक ३०/०८/२०२५ रोजी मी घरी नसताना पुन्हा पोलीस भोसले व पोलीस बोळके हे माझे घरी येऊन माझा भाऊ नितीन याचेकडे मी कुठे आहे याबाबत चौकशी केली.त्यावेळी माझ्या भावाने मी बाहेरगावी गेलो असल्याचे सांगुन काय विषय आहे तो माझेशी बोला असे म्हणाला असता पोलीस भोसले व बोळके यांनी सौदागर याचे विरोधात दाखल गुन्हयातुन तुझ्या भावाचे नाव कमी करायचे असल्यास कुकलारे साहेबांनी पाच लाख रूपये दयायला सांगितले आहेत असे म्हणाले त्यावेळी भावाने आता पैसे नाहीत मी सोमवारी साहेबांना येऊन भेटतो असे सांगितले.त्यानंतर मी घरी फोन केल्यानंतर मला भावाने नमुद घटनेबाबत माहिती देवून कुकलारे साहेबांसाठी पाच लाख रुपये पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी मागितले असुन ते तुला गुन्हयात आरोपी करतील असे म्हणाले आहेत.त्यावेळी मी घाबरुन त्याला ठिक आहे तु सोमवारी पोलीस स्टेशनला जावुन साहेबांना भेट आणि विषय मिटवुन टाक असे म्हणालो. त्यानंतर सोमवार दिनांक ०१/०९/२०२५ रोजी माझा भाऊ नितीन व त्याचा मित्र राजेंद्र सोनटक्के हे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता कुकलारे साहेबांनी माझ्या भावाकडे पाच लाख रुपयाची मागणी करुन चार लाख रुपये घेतले.

त्यानंतर दिनांक १५/१०/२०२५ रोजी मला पोलीस भोसले यांनी लोहारा पोलीस स्टेशन येथे बोलाविले असता मी पोलीस स्टेशन येथे गेलो तेथे पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी मला माझ्या मित्राविरूध्द दाखल गुन्हयात सह आरोपी न करण्यासाठी पैशाची मागणी करून पैसे न दिल्यास आरोपी करतो असे सांगुन कुकलारे साहेबांना देणेसाठी आणखी पाच लाख रूपयाची मागणी केली. सदरवेळी मी त्यांना सध्या माझेकडे पैसे नाहीत याआधी तुम्ही माझ्याकडुन माझे सोन्याचे कडे घेतले आहे असे बोललो असता त्यांनी तु पाच लाख रुपये दे आणी तुझे कडे घेवुन जा असे बोलुन माझ्याकडे पाच लाख रुपयाची मागणी केली. त्यावर मी त्यांना तुम्हाला नंतर भेटतो असे सांगून तेथून निघुन

pps
14/11/25

आलो. त्यानंतर मला भिती वाटल्याने मी सदरची गोष्ट कोणालाही सांगितली नाही. आज दि.०६/११/२०२५ रोजी पोलीस भोसले,पोलीस बोळके यांनी मला पोलीस स्टेशनमध्ये भेटावयास बोलाविले आहे. मी त्यांना भेटावयास जाणार असुन ते माझेकडे पैशाची मागणी करणार असुन सदरची रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने तसेच मला कुकलारे साहेब, पोलीस भोसले, पोलीस बोळके यांना लाच देण्याची इच्छा नाही. तसेच माझेत व कुकलारे साहेब,पोलीस भोसले, पोलीस बोळके यांचेत कसलाही आर्थिक व्यवहार नसुन भांडण तंटा नाही. माझी त्यांचेविरूध्द तक्रार असून त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती."वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.नारायणकर यांना नमूद लोकसेवक पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी कधी व कुठे भेटण्यास बोलाविले आहे अशी विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,पोलीस भोसले व पोलीस बोळके यांनी लोहारा पोलीस स्टेशन येथे बोलावले असुन तेथे जाऊन मी त्यांची भेट घेतो.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.नारायणकर यांचेकडे लोकसेवक पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,पोलीस भोसले व पोलीस बोळके हे लाच मागणी करतात अगर कसे?याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र.१ म्हणून इलाही मौला मोगल पंच क्र.२ म्हणून निलेश विलास कदम हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ व क्र.०२ यांचे निवेदन घेण्याचे ठरल.त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले.व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.त्यानंतर तक्रारदार नारायणकर व पंच क्र.१ मोगल पंच क्र.०२ कदम यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ १६.३६ वा ची होती.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,लोकसेवक पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले.त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो तक्रारदार श्री.नारायणकर यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफ्टी पिन च्या सहाय्याने पोशि तावरे यांनी लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.०१ मोगल यांचेसह पडताळणीकामी मार्डी गाव,ता.लोहारा येथुन त्यांचे चारचाकी वाहन क्र.एम एच २५ बी ए ९०७५ मधुन लोहारा पोलीस स्टेशन येथे रवाना केले ती वेळ १७.०० वा ची होती.

त्यानंतर आम्ही सापळा पथक ,पंच क्र.०२ असे मार्डी गाव येथे रोडचे एका बाजुस थांबुन राहिलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.०१ असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ १७.२९ वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.०१ मोगल यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,लोकसेवक पोलीस भोसले व पोलीस बोळके उपस्थित नव्हते त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन पोलीस बोळके यांचे मोबाईल क्रमांक वर फोन केला असता फोन लागला नाही त्यावेळी तक्रारदार यांनी तेथे उपस्थित असणाऱ्या व्यक्ती यांना पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब ,लोकसेवक पोलीस भोसले व पोलीस बोळके साहेब कुठे आहेत असे विचारले असता पोलीस भोसले व पोलीस बोळके नसल्याचे सांगितले तसेच कुकलारे साहेब सुट्टीवर असल्याचे सांगितले.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार श्री. नारायणकर यांनी पंच क्र.०१ मोगल यांचेप्रमाणे हकिकत

14/11/25

सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.१ यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

त्यांनतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,आता रात्र झाली आहे पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचा मला अदयापपर्यंत फोन आला नाही त्यामुळे आज त्यांची भेट होण्याची शक्यता नाही तरी आज रोजीची कारवाई स्थगित करुन उदया दि.०७/११/२०२५ रोजी करु असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार यांनी विनंती केले नुसार दि. ०६/११/२०२५ रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यांनतर दि.०७/११/२०२५ रोजी आम्ही दोन्ही पंच ,पोशि पवार असे खाजगी वाहनातुन व पोलीस निरीक्षक निंबाळकर व सापळा पथक, आवश्यक साहीत्यासह शासकिय वाहनातुन बुलडाणा अर्बन बँकेचे भक्त निवास ,तुळजापुर येथुन ०८.४५ वा रवाना होऊन तक्रारदार यांनी सांगितलेप्रमाणे मार्डी गाव येथे ०९.३० वा पोहोचलो.त्या ठिकाणी तक्रारदार हे उपस्थित होते. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी तक्रारदार यांना पंच क्र.०१ मोगल यांचे सह शासकिय रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पडताळणीकामी लोहारा पोलीस स्टेशन येथे पाठवण्याचे ठरलेने त्यांनतर यापुर्वी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड तात्पुरते खाकी पाकीटात सिलबंद करुन सुरक्षितरीत्या ठेवले होते.सदर सिलबंद खाकी पाकीटातील मेमरीकार्ड पंचासमक्ष बाहेर काढुन सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये यापुर्वी ध्वनीमुद्रीत झालेल्या रेकॉर्डीग फाईल सुरक्षीत असल्याची तक्रारदार, पंच व सापळा पथकास खात्री करुन दिली.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर व पंच क्र.१ मोगल व पंच क्र.०२ कदम यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ १०.१९ वा ची होती.त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच यांना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो पोशि तावरे यांनी तक्रारदार श्री.नारायणकर यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफ्टी पिन च्या सहाय्याने चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.०१.मोगल यांचेसह १०.३२ वा पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील चारचाकी एम एच २५ बी ए ९०७५ मधुन मार्डी गाव येथुन रवाना केले व आम्ही पथकासह सदर ठिकाणी शासकिय वाहनात थांबुन राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.०१ असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ १०.५६ वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.०१ मोगल यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस स्टेशन इन्चार्ज एपीआय कुकलारे ,पोलीस भोसले व पोलीस बोळके पोलीस उपस्थित नव्हते त्यावेळी तक्रारदार यांनी पोलीस बोळके यांना फोनवर संपर्क केला असता सदर फोन वरील संभाषणा दरम्यान पोलीस बोळके यांनी ते धाराशीव उस्मानाबाद येथे असल्याचे सांगुन सोमवारी ११ वाजता या मी पण येतो,जाऊ समोर असे बोलले त्यानंतर तक्रारदार यांनी पोलीस बोळके यांना "हा..आणि मला एक सांगा साहेब ते त्यांनी कडं कुठं ठेवल्यात.....मजी सोनारापाशी ठेवल्यात का त्यांच्या पाशिच हे....त्यावर पोलीस बोळके हे "जिम्मेदारी मी घेतल्यावर विषय संपला की कुठं पुरुन का ठेवना..असे बोलले व सोमवारी सकाळी ११ वाजता येणेस सांगितले.त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेले ठिकाणी परत आलो.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.०१ मोगल यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

त्यांनतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस बोळके यांनी मला सोमवारी भेटायला बोलावले आहे त्यामुळे मी सोमवारी पोलीस

12/11/25

पोलीस स्टेशन इन्चार्ज एपीआय कुकलारे ,बोळके व पोहया भोसले यांची भेट घेतो तरी आज रोजीची कारवाई स्थगित करुन सोमवार दि.१०/११/२०२५ रोजी करु असे सांगितलेने दि.०७/११/२०२५ रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.१०/११/२०२५ रोजी पुढील कारवाई करण्याचे ठरलेने आम्ही ,पोशि पवार व दोन्ही पंच असे खाजगी वाहनाने व पोलीस निरीक्षक निंबाळकर व अंमलदार लाप्रवि पुणे हे त्यांचे शासकिय वाहनाने लोहारा येथे तक्रारदार श्री.नारायणकर यांचे नातेवाईकांचे घरी लोहारा येथे ०९.४५ वा चे सुमारास पोहोचलो

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी तक्रारदार यांना पंच क्र.०१ मोगल यांचे सह शासकिय रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पडताळणीकामी लोहारा पोलीस स्टेशन येथे पाठवण्याचे ठरलेने त्यानंतर यापुर्वी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड तात्पुरते खाकी पाकीटात सिलबंद करुन सुरक्षितरीत्या ठेवले होते.सदर सिलबंद खाकी पाकीटातील मेमरीकार्ड पंचासमक्ष बाहेर काढुन त्यांचेकडील सोनी कंपनीच्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यामध्ये यापुर्वी ध्वनीमुद्रीत झालेल्या रेकॉर्डीग फाईल सुरक्षीत असल्याची तक्रारदार, पंच व सापळा पथकास खात्री करुन दिली.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर व पंच क्र.१ मोगल व पंच क्र.०२ कदम यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ १०.२१ वा ची होती.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली व व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करुन तो पोशि तावरे यांनी तक्रारदार श्री.नारायणकर यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस सेफ्टी पिन च्या सहाय्याने चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.०१.मोगल यांचेसह १०.३६ वा पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील चारचाकी एम एच २५ बी ए ९०७५ मधुन तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घर लोहारा गाव येथुन रवाना केले व आम्ही पथकासह सदर ठिकाणी थांबुन राहीलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.०१ असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ ११.१२ वा.ची होती.

त्यानंतर मी पंच क्र.०१ मोगल यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस भोसले व पोलीस बोळके पोलीस उपस्थित होते त्यावेळी तक्रारदार यांनी पोलीस बोळके यांची भेट घेतली सदर भेटी दरम्यान तक्रारदार व पोलीस बोळके यांची कामासंदर्भात चर्चा झाली सदर चर्चो दरम्यान पोलीस बोळके यांना "कस....कस करायच सांगा त्या पध्दतीने पट म्हणून मोकळ व्हाव उग जिकड-तिकड उग चर्चाला कारण.. कस होत माहितीय का..विष्णु आं..एव्हड पैसे दिला ..कड दिला ...तुम्हाला सांग तु साहेब मी...तुमच्यावर विश्वास दुला म्हणून कड काढून दिलो नाहीतर हयांनला दिलो असतो का?त्यावर पोलीस बोळके हे "हे नाई" असे बोलले त्यावर तक्रारदार हे पोलीस बोळके यांना "मी काय सांगायलो तुम्ही मला अं..कड दुसरीकडे ठिवायचय"असे बोललो असता पोलरस बोळके हे "दुसरीकड ठेवा नाहीतर पुरून टाका..आमच कामाय तुम्हाला पोच करायच..चिमटा घ्यायचा..आं"असे म्हणाले.त्यावर तक्रारदार हे "एकदा बोलून घ्या म्हजी"असे म्हणले "त्यावर बोलतो चार वाजता" असे बोलुन तक्रारदार यांना चार वाजता बोलावले.त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.०१ मोगल यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी ,पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.१ यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.

12/11/25

त्यांनतर तक्रारदार यांना मी पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस बोळके यांनी मला १६.०० वाजता भेटायला बोलावले आहे परंतु मी १५.३० वाजता पोलीस बोळके व पोहवा भोसले तसेच पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब यांची भेट घेतो म्हणजे ते सर्व जण मला भेटतील असे तक्रारदार यांनी सांगितले त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच यांना सुचनांची उजळणी करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लावनु दिला व पोलीस स्टेशन लोहारा येथे पोलीस भोसले ,पोलीस बोळके ,पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे यांचेकडे तक्रारदार यांचे नातेवाईकाचे घर लोहारा येथुन पडताळणीकामी रवाना केले ती वेळ १५.२९ वा ची होती व सदर ठिकाणी पंच क्र.०२ कदम व सापळा पथक थांबुन राहीलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.०१ असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ १७.३५ वा.ची होती.

त्यानंतर आम्ही पंच क्र.०१ मोगल यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी बोळके पोलीस उपस्थित नव्हते त्यामुळे तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९७६३११३३०२ वरुन बोळके यांचे मोबाइल क्रमांक ९८२२०८४५८७ वर फोन केला असता पोलीस बोळके यांनी दहा पंधरा मिनीटात येतो असे सांगितले.त्यानंतर थोडया वेळाने पोलीस बोळके तेथे आले व तुमचा काम झाल्या शिवाय जाणार नाय असे बोलले व तेथुन निघुन गेले त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस माळी आले त्यावर तक्रारदार यांनी पोलीस माळी यांना "तीन घंटे झालं बोळके मेजर नी बसवलीय" असे बोललो असता त्यावर ते किती राहले आता.....किती राहिलेते? किती दिले किती राहिले असे पोलीस माळी यांनी विचारले असता त्यावर तक्रारदार त्यांना "आता त्यांनीच सांगायचं ....मी.काहीच बोलन नाय.असे बोलले असता पोलीस माळी तक्रारदार यांना "व्यवहार तुमचा काय झालायं काय नाय...दिसले मला जाता जाता म्हणुन म्हणल असे बोलले. यावर तक्रारदार त्यांना तुम्हाला माहित आहे हे डबल चाललयं साहेब, साहेबाला तुमचा पोहचल्यात पहिले हयाच्या पहिले असे बोलले असता तक्रारदार पोलीस माळी यांना "अहो मी काय म्हणायलो तुमच्या ठिकाण यायला का तुमचा व्यवहार आहे वाटत ना बोळके साहेबांचा ...अनं तुमचा" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे पोलीस माळी यांना "नाय ते नाही कडयांच" असे म्हणाले असता,ते काय माहित नाय मला असे पोलीस माळी बोलले व निघुन गेले.त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस बोळके आले त्यावेळी तक्रारदार पोलीस बोळके यांना "आता काय तुमचीच वाट बघत बसलोय..असे बोलले त्यावर "माझ काय नाही..मी सांगितलय..तर आता फोन आला का, लगेच तुमच्या तुमाला एक फोन येतय तीथ जावुन करा मग."असे पोलीस बोळके तक्रारदार यांना म्हणाले.त्यावेळी पोलीस भोसले तक्रारदार यांना "जाणुन-बुजुन करायलाय काय,सांगितल ना आठ वाजेपर्यंत फोन येईल म्हणुन, बिलकुल येईल, बार-बार हिकड येवुन" नाही आला फोन तर उद्या सकाळी येईल कळल का ? असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी पोलीस भोसले यांना माझी अडचणय असे सांगितले असता "एकदा सांगितल ना तिथ उभारुन आठ वाजता फोन येईल म्हणुन..बार-बार यायच आणि बगत उभा राहायच तसल करु नका..जी झाकुन ठेवायच असतय ती उघड करायच नसतय..कवा बी..", ज्या माणसाकड गेलताव तेजाच फोन येईल कळल का.. असे पोलीस भोसले तक्रारदार यांना म्हणाले.त्यानंतर साहेब आहेत का? असे पोलीस बोळके यांना तक्रारदार यांनी विचारले असता "त्यावर आलेत की सकाळीच. गेलेत व्हीजीटला.. मी फोन करतो तुमाला किती वाजेपर्यंत वाट बघणार फोनची आट वाजेपर्यंत म्हणलय ना..म्हणल का नाही बर ठिकाय नऊ..काय फरक पडालाय असे बोलले.त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर तक्रारदार

12/11/25

श्री.नारायणकर यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.०१ मोगल यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर व मी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.१ यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.त्यांनतर तक्रारदार यांना मी पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की, पोलीस बोळके व पोलीस भोसले यांनी आठ वाजता फोन येईल असे सांगितले आहे.त्यांच्या फोन ची वाट पाहु त्यांचा फोन आला नाही तर मी पोलीस स्टेशन येथे जाऊन पोलीस बोळके व पोलीस भोसले व पोलीस स्टेशन इन्चार्ज यांची भेट घेतो असे सांगितले.त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितले की,पंच क्र.१ हे माझे बरोबर बऱ्याच वेळा आले असुन त्यांचा पोलीसांना संशय येण्याची शक्यता आहे तरी आता पंच क्र.०२ कदम यांना माझे सोबत पाठवा अशी विनंती केलेने त्यांचे सोबत पडताळणीकामी पंच क्र.०२ कदम यांना पाठविण्याचे व पंच क्र.०१ मोगल हे सापळा पथकासोबत थांबतील असे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. नारायणकर व आम्हा पंचांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ २०.२५ वा ची होती. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच यांना सुचनांची उजळणी करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पोशि तावरे यांनी लावनु दिला व पोलीस स्टेशनचे इन्चार्ज ए.पी.आय कुकलारे साहेब ,पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचेकडे पडताळणीकामी लोहारा पोलीस स्टेशन येथे रवाना केले ती वेळ २०.३८ वा ची होती. पंचापैकी मोगल व मी , सापळा पथक असे तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घरी लोहारा येथे थांबुन राहीलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.०२ कदम असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ २२.०५ वा.ची होती.

त्यानंतर मी तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व पंच असे लोहारा पोलीस स्टेशन येथे गेले असता सदर ठिकाणी पोलीस स्टेशन इन्चार्ज कुकलारे साहेब पोलीस भोसले,पोलीस बोळके व पोलीस तिगाडे उपस्थित होते. त्यावेळी तिघाडे पोलीस तेथे आले व हित काय आहे असे विचारले असता त्यावेळी मी साहेबाला भेटायचय असे बोललो.त्यानंतर तेथे पोलीस भोसले आले त्यावेळी मी त्यांना हे आस करून नका भोसले साहेब तुमच्या पाया पडतो...आस बेजार करू नका...खरच पाया पडतो" असे बोललो त्यावर पोलीस भोसले हे "राजभाऊ सोनटक्केचा फोन ईन तुम्हाला" असे बोलले.त्यावर मी त्यांना मी तुम्हाला दिलय साहेब कड असे बोललो असता त्यावर भोसले पोलीस बोलले की, "हो ना मग मी हायकी जिम्मेदार का टेन्शन घेताय" त्यावर मी त्यांना पोलीस भोसले यांना "की व्हाय बघा बारी क हाय सांगा आज एक लाख वीस हजार किंमतय साहेब...बारालाखाची वस्तु मी तुम्हाला शुन्य मिनिटात दिलेय दहा तोळयाच सोन्याच कड...लोकांना गुंज बी मिळता येईना कुणाला" असे बोलले.त्यावर भोसले पोलीस हे "मिळून जाईन तुझ तुमची वस्तु तुम्हाला" असे बोलले त्यावर मी त्यांना "नाय हाय म्हणून ...साहेब आज तागायत मी तुमच्यावर विश्वास होता म्हणून अक्षरशा दहा तोळयाच सोन्याच कड दिलो ना खाट म्हणून काढून दिल का नाय काढून असे बोललो."त्यावर पोलीस भोसले हे "हाय का गेला विश्वास" असे बोलले त्यावर पोलीस तिघाडे हे "अहो एवढ काय सांगा ना ते देतील की मंग" असे बोलले.त्यावर मी "अहो तिघाडे साहेब देतील पण मला काय म्हणायचय." असे म्हणालो त्यावर पोलीस भोसले "ती

12/1/25

गोष्ट...इकड ऐका पहिल माझ गोष्ट कशी रहाते झाकली मुळ सव्वा लाखाची रहाते" असे म्हणाले असता आयो असलाय म्हणून मी बोललो का कुणाला मी असे बोलले.त्यानंतर पोलीस भोसले "आता व्यवहार बोलायचा नाही तोंडातुन आला नाही पाहिजे" असे बोलले.त्यावर मी पोलीस भोसले यांना "मी डायरेक्ट दिलय साहेब तुम्हाला"असे म्हणालो असता त्यावर भोसले पोलीस "होय की मग...तुम्हाला मग ईन ना तिथुन" उदया क्लिअर होवुन जाईन बाराच्या आता आम्हाला काही तरी गोष्टी राहत्यात...सांगाव लागतय..हयोका केल बगा क्लिअर...हिकडून दबावय ठिकय झाल का त्याच दिवून टाक. काय ती आता तुमच हाय की पहिलच सांगितलय की तुम्हाला ...तुमच ती वस्तु मिळाली की...तुम्हाला किती दयायच्यात काय ती तुमच तुम्हाला माहित आहे की असे बोलले त्यावर मी पोलीस भोसले यांना "नाही तुम्ही मला एक सांगा पैसे कमी असल्यावर घेणार का? असे म्हणालो त्यावर पोलीस भोसले "तुम्ही बोलू नका व्यवहार बोलून बोलून गोल गोल करालाव का मला" असे म्हणाले. त्यावर मी माझा त्या गुन्हयात काय संबंध नसताना सुध्दा मी एका मिनिटात काढून दिला" असे बोललो.त्यावर पोलीस भोसले आता अजुन तुम्ही भरकटलाव असे म्हणाले. त्यांनतर मी सपोनि कुकुलारे यांचे केबिनमध्ये प्रवेश केला त्यावेळी सदर केबीनचे आतमध्ये लोकसेवक भोसले व तिघाडे हे पण आले सदर वेळी पंच क्र.२ यांना पोलीस भोसले यांनी हाताने बाहेर थांबणेस सांगितले त्यावेळी पंच २ कदम हे सदर केबिनचे दरवाज्याचे जवळ आम्ही सर्वजण दिसेल असे उभे राहीले व आमचे संभाषण ऐकुन राहीले. त्यानंतर मी एपीआय कुकलारे साहेब यांना "सर तुमच्या पाया पडतो काय चुकल असल तर बघा मला आठ दिवस झाले परेशान करू लागलेत देतो देतो"असे म्हणाले ,त्यावर सपोनि कुकलारे "कोण" असे म्हणाले त्यावर मी सगळेच...तो विषय दिलाच नाही.तिन आत्महत्या केल्यावर परत माझही सगळ एकतर घरात साहेब सगळयांनी मिळून मला ती कड घातल होत असे बोललो.त्यावर एपीआय कुकलारे साहेब "हंमम" असे म्हणाले. त्यावर मी "मला कायेय ती सांगा म्हणाललते..आण बर मी काय आसल ती करायला बी तयार आहे ना काय तुम्ही मी एका मिनिटात काढून दिलय साहेब हे विचारा हयांना (लोकसेवक भोसले यांचेकडे पाहून) असे म्हणालो. त्यावर एपीआय कुकलारे "हंमम...काय ती क्लिअर करून टाका" असे म्हणाले. त्यावर मी म्हणालो बर त्या गुन्हयात माझा काय तरी संबंध हाय का तीन मरणाच मरून गेली पण साहेब तस नाही उदया गटना पण मी बी त्या दिवशी तुम्हाला काय म्हणल साहेब डीवायएसपी साहेब तीन आत्महत्याच केली"त्यावर एपीआय म्हणाले "हाड फॅक्चर झाल नसत पण क्लिअर कट राहील असत ना हॅगिंग सगळ डिस्ट्रॉय झाल्यामुळ प्रॉब्लेम झाला ना आता तो" त्यावरन मी,हायला नाय साहेब ती तुम्ही फोन केला मला घटना घडल्या घडल्या ती सौदा मला हित बोलवायला आला माळी साहेबांन मला माळी साहेब, राठोड साहेब तुम्ही जावा म्हणाले मला पाठविले अण पुन्हा सगळ ती भोगायची वेळ येयू लाली साहेब असे म्हणाले त्यावर पोलीस भोसले "आता झाल की सगळ"असे म्हणाले असता मी त्यांना "आणि साहेब अजून एक सांगु नाही साहेबाला कानावर पाहिजेन..चार्जशीट मध्ये तुझ नाव घालतो ही कुठली पध्दत साहेब"असे बोललो.त्यावर एपीआय कुकलारे हे "कोण म्हणाल"? आर तु मला विचारयच ...तपास अधिकारी मी ये का कोणय? असे म्हणाले. त्यावर मी "आणि एक साहेब मजे तुम्हाला काय बी सांगितलाय..लय का

12/11/25

होवू नये..लय काय होवू नये'' त्यावर पोलीस भोसले हे ''बोलतिल तिघाडे साहेब सकाळी'' असे म्हणाले.त्यावर तिघाडे हे ''बोल मी बोलता सकाळी'' असे म्हणाले.त्यावर पोलीस भोसले हे तिघाडे साहेबाकडे जावा ,माझ्याकड या असे म्हणाले.त्यावर तिघाडे ''माझ्यापाशी अकरा वाजता या'' असे म्हणाले त्यानंतर साक्षीदार केलं व तुम्हाला त्याच्यातं असे एपीआय कुकलारे बोलले असता मी ''अवं साक्षीदार फिक्षीदार काय घेवु नका असे म्हणालो असता ''येडायंका मेन साक्षीदार ..मेन तुम्हीच मुख्य साक्षीदार'' असे एपीआय कुकलारे बोलले.सदर संभाषणा दरम्यान मी ''हा आणि ते एकदा सांगा अन मला काय म्हणायचं साहेब राजाभाऊ ने जे दिलं मागं, नितीनने जे दिलं होतं ते पोहचेललं नाय का ते मधीच हाणा आता''असे बोलुन आता तिघाडे साहेबांना भेटू का भोसले साहेबांना असे म्हणालो असता ''कोणला भेटायचं भेटा'' असे एपीआय कुकलारे बोलले.त्यावर मी त्यांना ''हां मग मी करतो लय होवू नये पहिलं नितीनने जे चार लाख रूपये दिले आता''असे म्हणालो त्यावर एपीआय कुकलारे ''हां'' असे बोलले..व एपीआय कुकलारे ,पोलीस भोसले आणि तिघाडे हे त्यांचे केबीनचे बाहेर चालत येऊ लागले मी ही त्यांचे बरोबर बाहेर येत असताना पंच क्र.०२ कदम यांनी कुकलारे यांना टाईम विचारला त्यानंतर मी ''किती देवू? असे एपीआय कुकलारे यांना विचारुन मी ''तीन लाख दिले'' असे मी म्हणालो असता त्यावर एपीआय कुकलारे ''हां'' असे बोलले.त्यावर परत मी ''साहेब तीन लाख रुपये..म्हणजे ते पहिल दिलेलं''असे बोललो त्यावर पोलीस तिघाडे ''ते तीन लाख रुपये..तेला दिलेलं..'' असे मी त्यांना बोललो त्यावर मी त्यांना ''फक्त दोन लाख रुपये तेवढ द्यायचेत..म्हणजे ती उद्या ती माणुस हेणला त्या माणसा सारखाच बोलतय परत.'' आता नितीनं मला चार लाख रुपये डायरेक्ट दिल ते नितीन दिल का राजाभाऊ न दिल ते मला माहित नाही. ती परस्थितीपण मला माहित नाही.असे मी म्हणालो असता ''तीन भेटले दोन आता देवुन टाकायचे देवून टाक.. विषय मोकळ हो.''असे बोलुन एपीआय कुकलारे यांनी यापुर्वी ०३ लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन परत माझेकडे ०२ लाख रुपये लाच मागणी करुन सदर लाच रक्कम पोलीस तिघाडे किंवा पोलीस भोसले यांचेकडे देणेस सांगितले.याप्रमाणे पोलीस भोसले आणि पोलीस बोळके यांनी यापुर्वी माझेकडुन घेतलेले १० तोळे सोन्याचे कडे घेतलेचे मान्य करुन एपीआय कुकलारे यांनी मागणी केलेली ०२ लाख रुपये लाच रक्कम घेऊन मला सकाळी ११.०० वाजता बोलावले आहे.त्यानंतर मी व पंच कदम असे आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.सदर पडताळणी कारवाई दरम्यान पोलीस भोसले व पोलीस बोळके यांचेशी संभाषणा दरम्यान पंच श्री.कदम हे माझे बरोबर होते. अशा वर्णनाची हकिकत तक्रारदार यांनी सांगितली त्यानंतर मी पंच कदम यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले नुसार वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर मी पोलीस निरीक्षक निबाळकर यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.२ कदम यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार श्री.विष्णु भिमराव नारायणकर ,रा.लोहरा यांनी दि.०६/११/२०२५ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.०६/११/२०२५,०७/११/२०२५ व दि.१०/११/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे मित्राविरुध्द लोहारा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयात तक्रारदार

12/11/25

यांना सहआरोपी न करणेसाठी तक्रारदाराकडे यापुर्वी एपीआय कुकलारे यांचेकरीता पोलीस भोसले व बोळके यांनी पाच लाख रुपयाची मागणी केली होती त्यावेळी तक्रारदाराकडे पाच लाख रुपये नसलेने तक्रारदाराने त्याचे हातातील १० तोळे सोन्याचे कडे काढुन दिले होते.सदरचे कडे पोलीस भोसले व बोळके यांनी तक्रारदाराकडे यापुर्वी मागणी केलेले पैसे आणुन देई पर्यत स्वत:कडे ठेऊन घेतल्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले तसेच लोहारा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी एपीआय कुकलारे यांचेकडे सदर गुन्हयाचा तपास असुन सदर गुन्हयात तक्रारदार यांना सहआरोपी न करणेसाठी त्यांनी पडताळणी कारवाई मध्ये तक्रारदाराच्या भावाकडुन यापुर्वी तीन लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन तक्रारदाराकडे आणखी दोन लाख रुपयाची लाच मागणी करुन पोलीस भोसले किंवा तिघाडे यांचेकडे देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांना पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले की एपीआय कुकलारे यांनी मागणी केलेली लाच रक्कम घेऊन पोलीस भोसले व पोलीस तिघाडे यांनी मला उदया दि.११/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता बोलावले आहे.त्यामुळे आज १०/११/२०२५ रोजी कारवाई स्थगित करण्यात यावी अशी विनंती केलेने दि.१०/११/२०२५ रोजी ची कारवाई स्थगित करुन पुढील सापळा कारवाई दि.११/११/२०२५ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर तक्रारदार यांना सदर कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत व दि.११/११/२०२५ रोजी तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घर लोहारा येथे सकाळी ०९.०० वा लाच रक्कम २,००,०००/- रुपये येणेबाबत सुचना देऊन निवासस्थानी रवाना केले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.११/११/२०२५ रोजी आम्ही तक्रारदार यांचे नातेवाईक यांचे घर लोहारा येथे उपस्थित असताना दि.१०/११/२०२५ रोजी दिलेल्या सुचनेनुसार तक्रारदार सकाळी ०९.०० वाजता हजर झाले त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार नारायणकर यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरु करण्यात येत असल्याबाबत सांगितले.त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार नारायणकर यांना दोन्ही पंचासमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम २,००,०००/- रुपये हजर केले.त्यानंतर मपोहवा काळे पोशि आडके यांनी नमुद नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले.

त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मोबाईल मध्ये टाकुन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार नारायणकर त्यानंतर पंच क्र.०१ श्री.मोगल व पंच क्र.०२ कदम यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ १०.३२ वा ची होती. सदर वेळी तक्रारदार यांच्या मोबाईल फोनवर अनोळखी नंबर ९२२६३३५०३५ वरुन फोन येऊन गेला असल्याचे सांगितले असता तात्काळ तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक ९७६३११३३०२ वरुन त्या अनोळखी नंबर वर फोन करण्याचे ठरवुन सदर फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डवर रेकॉर्ड करण्याचे ठरवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु केला व त्या अनोळखी नंबरवर फोन लावला ती वेळ ११.१४ वा ची होती.सदर संभाषणा दरम्यान अनोळखी नंबरवरुन पोलीस भोसले हे बोलत असल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. पोलीस भोसले हे उमरग्याला चाललोय मी येतो थोडया वेळात घेवुन येतो आलो की फोन करतो .मी तुम्हाला इकडुन निघालो की फोन करतो असे म्हणाले त्यानंतर सदर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.त्यानंतर १४.३० वा चे सुमारास आम्ही घरामध्ये दारे खिडक्या बंद करुन कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार नारायणकर यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी करून दाखवले.त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेले लाचेकामी

PB
12/11/25

वापरण्याची रक्कम पोहवा/काळे यांना अँन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, मपोहवा/२००८ काळे यांनी कापसाच्या बोळ्याने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजुस तसेच लिफाफयास आतुन बाहेरुन अँन्थ्रासीन पावडर लावली व त्यांनतर मपोहवा/२००८ काळे यांनी सदर लाचेची रक्कम रुपये २,००,०००/- तक्रारदार नारायणकर यांच्या नेसणीस असलेल्या निळ्या रंगाची जिन्स ची पॅन्टच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशात ठेवली.त्यानंतर आम्ही पंचांना तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सुचना दिल्या.त्यांनतर पोलीस भोसले यांच्या फोनची वाट पाहत थांबलो.परंतु पोलीस भोसले यांचा फोन न आल्याने तक्रारदार यांचे वरील मोबाईल क्रमांकावरुन पोलीस तिघाडे यांच्या मोबाईल क्रमांक ९१३०७५९२४७ वर फोन केला व सदर फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ध्वनीमुद्रीत केला ती वेळ १५.१९ वा ची होती. सदर फोन कॉल संभाषणा दरम्यान पोलीस तिघाडे यांनी ते भातगळयाला कार्यक्रम नायका तिथं आलतो जरा कार्यक्रमामध्ये , तिकडुन आल्यावर फोन करतो असे म्हणाले असता तक्रारदार त्यांना मग मग मी येवु का तिकडं शेताकड येताना असे बोलले व फोन कट केला.त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर एपीआय कुकलारे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना पंच क्र.०२ कदम यांचेसह भातागळी येथे त्यांची हिरो होंडा दुचाकी क्र.एम.एच-२९ बी एस ६०१५ पाठविणेचे ठरले व पंच क्र.०१ पोलीस निरीक्षक निंबाळकर ,मपोहवा गोरे पोशि तावरे असे शासकिय वाहनामधुन तक्रारदार यांचे वाहनामागे रवाना होतील व मी,पोशि आडके व पोशि पवार असे पोलीस स्टेशन पासुन काही अंतरावर खाजगी वाहनामध्ये थांबुन राहतील व पोलीस तिघाडे यांनी लाच रक्कम स्विकारले नंतर व पोलीस तिघाडे यांना ताब्यात घेतले नंतर मला दुरध्वनीवरुन कळवतील असे सर्वानुमते ठरविणेत आले.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आत लाऊन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.०२ कदम यांचे सह १५.४५ वा.चे सुमारास त्यांचे दुचाकी वरुन रवाना केले.त्यांचे पाठोपाठ पंच क्र.०१ पोलीस निरीक्षक निंबाळकर ,मपोहवा गोरे पोशि तावरे असे शासकिय वाहनामधुन रवाना केले व मी ,पोशि पवार ,पोशि आडके यांचेसह लोहारा पोलीस स्टेशन येथील काही अंतरावर कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबुन राहीलो.त्यानंतर १९.०० वा चे सुमारास पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी आम्हास कळविले की,पोलीस तिघाडे यांनी लाच रकमेचा स्विकार केल्याने त्यांना ताब्यात घेतले असुन पुढील कायदेशिर प्रक्रिया करुन त्यांना पोलीस स्टेशन येथे घेऊन येत आहोत.त्यानंतर आम्ही लोहारा पोलीस स्टेशन येथे जाऊन एपीआय कुकलारे यांचे केबीनमध्ये जाऊन त्यांना ताब्यात घेतले व त्यानंतर पोलीस बोळके ,पोलीस भोसले यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर थोडया वेळात पोलीस निरीक्षक निंबाळकर हे पोलीस तिघाडे यांना घेऊन पथकासह पोलीस स्टेशन येथे आले त्यावेळी त्यांनी सांगितले की,तक्रारदार व पंच यांना सापळा कारवाई कामी रवाना केलेनंतर त्यांचे पाठोपाठ आम्ही रवाना होऊन भातागळी गावामध्ये तक्रारदार यांचे शेतामध्ये जाऊन शासकिय वाहन थांबवले व तक्रारदार ,पंच व पोलीस तिघाडे दृष्टीस दिसतील अशा प्रकारे तक्रारदार यांचे लाच स्विकारले नंतरच्या पुर्व नियोजीत इशाऱ्याची वाट पाहत थांबुन राहीलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला असता आम्ही व सापळा पथक असे तक्रारदार यांचे शेतात जाऊन पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ १८.५६ वा ची होती. त्यानंतर यापुर्वी सुचना दिलेप्रमाणे मपोहवा गोरे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले.त्यानंतर पोलीस तिघाडे यांचे दोन्ही हात पोशि तावरे यांनी घट्ट पकडुन पंचासमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर पंच कदम यांना पोलीस तिघाडे यांनी लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता पंच कदम यांनी सांगितले की, पालीस तिघाडे यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेली लाच रक्कम ही त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशामध्ये ठेवली आहे.

12/0/25

त्यानंतर पोलीस तिघाडे यांना पंचासमक्ष लाच रकमेबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशामध्ये लाच रक्कम असलेबाबत सांगितले व लाच रक्कम काढुन दिली.त्यानंतर टॉर्चच्या प्रकाशात आम्ही पंच क्र.०१ मोगल यांना पोलीस तिघाडे यांनी काढुन दिलेल्या लाच रकमेतील नोटांचे नंबर आणि पंच क्र.०१ मोगल यांचे जवळील सापळा पुर्व कारवाई दरम्यानचे नोटांचे नंबर लिहुन दिलेल्या कागदावरील नंबर हे एकच आहेत का याबाबत खात्री करण्यास सांगितले त्याप्रमाणे पंच क्र.०१ मोगल यांनी नोटांचे नंबर त्यांचेकडील कागदावर लिहीलेल्या नंबरशी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आले व सदर लाच रक्कम मोजुन पाहीली असता ती दोन लाख रुपये असल्याचे आढळुन आली.त्यानंतर सायंकाळची ची वेळ असल्याने अंधार पडल्याने अंधारामध्ये पोलीस तिघाडे यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम त्यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता पोलीस तिघाडे यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस ,बोटांच्या पेऱ्यावर निळसर चकाकी दिसुन आली.तसेच त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या दोन्ही खिशात्त अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली..तसेच पंच क्र.०१ मोगल यांचे हातासही ॲन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.सदर वेळी पोलीस तिघाडे यांची अंगझडती घेण्यात आली सदर वेळी पुर्व सुचना दिलेनुसार मपोहवा गोरे यांनी सदर कारवाईचे व्हिडीओ रेकॉर्डींग केले.त्यानंतर पोलीस तिघाडे यांना शासकिय वाहनामध्ये घेऊन लोहारा पोलीस स्टेशन येथे आलो असे पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी सांगितले.

तरी तक्रारदार श्री.विष्णु भिमराव नारायणकर ,रा.लोहरा यांनी दि.०६/११/२०२५ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.०६/११/२०२५,०७/११/२०२५ व दि.१०/११/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे मित्राविरुध्द लोहारा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयात तक्रारदार यांना सहआरोपी न करणेसाठी तक्रारदाराकडे यापुर्वी एपीआय कुकलारे यांचेकरीता पोलीस भोसले व बोळके यांनी पाच लाख रुपयाची मागणी केली होती त्यावेळी तक्रारदाराकडे पाच लाख रुपये नसलेने तक्रारदाराने त्याचे हातातील १० तोळे सोन्याचे कडे काढुन दिले होते.सदरचे कडे पोलीस भोसले व बोळके यांनी तक्रारदाराकडे यापुर्वी मागणी केलेले पैसे आणुन देई पर्यत स्वतःकडे ठेऊन घेतल्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले तसेच लोहारा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी एपीआय कुकलारे यांचेकडे सदर गुन्हयाचा तपास असुन सदर गुन्हयात तक्रारदार यांना सहआरोपी न करणेसाठी त्यांनी पडताळणी कारवाई मध्ये तक्रारदाराच्या भावाकडुन यापुर्वी तीन लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करुन तक्रारदाराकडे आणखी दोन लाख रुपयाची लाच मागणी करुन पोलीस भोसले किंवा तिघाडे यांचेकडे देण्यास सांगितले व दि.११/११/२०२५ रोजी पोलीस अर्जुन शिवाजी तिघाडे पोलीस नाईक १५९५ यांनी पंचासमक्ष २०००००/- रुपये लाच रक्कम तक्रारदार विष्णु भिमराव नारायणकर यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी १)ज्ञानेश्वर भिमराज कुकलारे वय-४३ वर्षे पद -सहायक पोलीस निरीक्षक,लोहारा पोलीस स्टेशन ता.लोहारा जि.धाराशिव २) सपोफौ निवृत्ती बळीराम बोळके वय-५७ वर्षे लोहारा पोलीस स्टेशन ३) श्री.आकाश मधुकर भोसले वय-३२ वर्षे पोशि /१३५ लोहारा पोलीस स्टेशन ४) अर्जुन शिवाजी तिघाडे वय-३४ वर्षे पोना नेमणुक लोहारा पोलीस स्टेशन व यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,७अ,१२ प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला....

समक्ष

PSI

12/11/25

**पोलीस ठाणे अंमलदार**

**पो.स्टे.लोहारा जि.उस्मानाबाद**